रक्तसंकलनात राज्यात पुणे अव्वल

संकलन आणि गरज यामध्ये मात्र अद्यापही तफावत

आज जागतिक रक्तदाता दिन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : रक्तदानाबाबतची सामाजिक बांधिलकी जपून पुणे शहर आणि जिल्ह्यात रक्तसंकलनात राज्यात अव्वल स्थान कायम राखले आहे. मुंबई दुसऱ्या स्थानावर, तर सोलापूर तिसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र, रक्तसंकलन आणि गरज यामध्ये अद्यापही तफावत असल्याचे दिसून येत आहे.

जागतिक रक्तदाता दिनानिमित्त राज्य रक्त संकलन परिषदेच्या वतीने गेल्या तीन वर्षांच्या रक्त संकलनाचा आढावा घेतला असता, पुणे जिल्हा रक्त संकलनात अव्वल असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. परिषदेच्या आकडेवारीनुसार, पुणे जिल्ह्यात २०२३ मध्ये (जानेवारी ते डिसेंबर) ३ लाख ४६ हजार ४५० पिशव्यांचे संकलन झाले. २०२४ मध्ये ३ लाख ४५ हजार ९६८, तर २०२५ मध्ये ४ लाख ६ हजार ३१९ पिशव्या रक्त संकलित झाले. रक्तसंकलनात मुंबई, सोलापूर हे जिल्हे अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. हिंगोली जिल्हा तळाला आहे.

'थॅलेसेमिया रुग्ण, अपघातांमधील गंभीर जखमी, कर्करुग्ण, अवयव प्रत्यारोपण करावे लागणारे रुग्ण वांसह गंभीर शस्त्रक्रियांसाठीही रक्ताची गरज सतत भासते. गेल्या काही वर्षांत पुणे जिल्ह्यात रक्तसंकलनाचा आकडा वाढत असून, शिबिरांची संख्याही वर्षभरात पाच हजारांच्या घरात पोहोचली आहे. शहरात शंभर वेळा रक्तदान केलेल्या दात्यांची, तसेच नव्या दात्यांची मोठ्या प्रमाणात भर पडत आहे.' असे जनकल्याण रक्तपेढीचे अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

पुणे जिल्ह्यात ५० रक्तपेढ्या असून, त्यामध्ये ससून रुग्णालय, औंध जिल्हा रुग्णालय आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणारे वायसीएम रुग्णालय या तीन ठिकाणी शासकीय रक्तसंकलन केंद्रे आहेत.

महाविद्यालयांतील प्रवेशासाठी आवश्यक पात्रता गुण (कटऑफ) ९० टक्क्यांपेक्षा अधिकच आहेत. काही ठिकाणी पात्रता गुणांमध्ये थोडी घट झाली. एकाच महाविद्यालयात अनुदानित आणि विनाअनुदानित तुकड्या असल्याने प्रवेशासाठी चुरस आहे.

> रक्तदानात महिलांचे प्रमाण कमी आहे. पुणे जिल्ह्यात हे प्रमाण पाच ते सहा टक्केच आहे. याचा अर्थ महिला रक्तदानासाठी पुढे येत नाही, असा मात्र नाही. रक्तक्षय, कमी वजन यामुळे अनेकींना इच्छा असली, तरी रक्तदान करता येत नाही.
>
> **– अतुल कुलकर्णी**, संचालक, जनकल्याण रक्तपेढी

> ससून रुग्णालयाकडून रक्तदाता दिनानिमित्त रक्तदान चळवळ आणि गैरसमजांचे निराकरण केले जाते. ऐच्छिक रक्तदात्यांची ससून रुग्णालयाला मदत होते. राष्ट्रीय सेवा योजना, महाविद्यालये, गणेश मंडळे यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिरांचे आयोजन होत असल्याने 'ससून'सारखी आवश्यक असणारी गरज पुरवली जाते.
>
> **– डॉ. एकनाथ पवार**, अधिष्ठाता, ससून रुग्णालय

> गेल्या महिन्यात प्रथमच रक्तदान केले. तो अनुभव खूप चांगला होता. कसलीही भीती वाटली नाही. यापुढीळ काळातही सातत्याने रक्तदान करायचे, असे आम्ही मित्रांनी ठरवले आहे.
>
> **– आशुतोष काळेले**, रक्तदाता

> पुण्यात डॅन्ग्यूचे रुग्ण पहिल्यांदा आढळले, तेव्हा १९९० मध्ये प्लेटलेट दान केले. आतापर्यंत २८० वेळा प्लेटलेट दान केले आहे. रक्तदान केल्यानंतर तीन महिन्यांनी रक्तदान करता येते. पण, प्लेटलेट दर १५ दिवसांनी दान करता येतात. सुरुवातीच्या काळात पुण्यात केवळ तीन ठिकाणीच ही सोय होती. त्यासाठी बराच वेळ लागायचा. आता हे केवळ ५० मिनिटांत होते.
>
> **– स्वानंद समुद्र**, रक्तदाता

> रक्तसंकलन वाढत असले, तरी मागणी आणि पुरवठा यामध्ये कायमच तफावत आहे. दर दिवशी जिल्ह्यात सातशे ते आठशे पिशव्या रक्तसंकलन होत असते. मात्र, आपली दिवसाची गरज १५०० पिशव्यांची आहे. त्यामुळे रक्तदान आणि रक्तदात्यांचा सहभाग वाढायला हवा.
>
> **– राम बांगड**, संस्थापक, रक्तासे नाते ट्रस्ट

दुसऱ्या फेरीतील प्रवेशांची मंगळवारपर्यंत निश्चिती

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीत २ लाख ६२ हजार ७७२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला. त्यापैकी ३२ हजार ४७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला असून, दुसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना १६ जूनपर्यंत प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली. राज्यातील ९ हजार ६३४ कनिष्ठ महाविद्यालयांतील जागांसाठी अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीच्या गुणवत्ता यादीसाठी ५ लाख ९७ हजार ८५२ विद्यार्थ्यांनी पसंतिक्रम नोंदविले होते. त्यातील २ लाख ६२ हजार ७७२ विद्यार्थ्यांना केंद्रीभूत प्रवेश जाहीर करण्यात आला. दुसऱ्या फेरीत प्रवेश निश्चित केलेल्या ३२ हजार ४७६ विद्यार्थ्यांपैकी २२ हजार ७१७ विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत पद्धतीने (कॅप), ९ हजार ७५९ विद्यार्थ्यांनी कोट्याद्वारे प्रवेश निश्चित केल्याची माहिती संचालनालयाने दिली.

दरम्यान, दुसऱ्या फेरीतही पुण्यासह राज्यातील नामांकित प्रवेशासाठी चुरस आहे.

प्रवेशात तांत्रिक अडचणी

- दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागले. तांत्रिक अडचणींमुळे प्रवेश होऊ शकणार नसल्याचे काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश घेता आला नाही. रविवारी (१४ जून) प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार असल्याचे प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळावर नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे.

जाहीर सूचना

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, **"श्री कृष्णा असोसिएट्स"** यांच्या मालकीच्या जमीन/मिळकत त्यांनी **सर्वे नं. १६/२/१ (पै), १६/२/२ (पै), १६/२/३ (पै), १६/२/४ (पै), १६/२/६ (पै), १६/२/७ (पै), १६/२/८ (पै), १६/२/९ (पै), १६/२/१० (पै)** बालाजी मंदिराजवळ, कांटे वस्ती रोड, पुनावळे पुणे ४११०३३ येथील पिंपरी चिंचवड महानगर पालिका यांच्या हद्दीतील **"सेटलेस प्राईड"** या प्रकल्पास दि. २३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये इ. सी. **आयडेंटिफीकेशन नंबर-EC23B038MH1126345 व फाइल नंबर- SIA/MH/MIS/282171/2022** असे नमूद करूनये आहेत. त्यानुसार पर्यावरण विषयक महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून परवानगी मिळालेली आहे. ही परवानगीची प्रत पर्यावरण मूल्यांकन अधिसूचना २००६ नुसार देण्यात आलेली आहे. सदर परवानगीची प्रत पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अधिकृत संकेतस्थळावर **http://parivesh.nic.in** उपलब्ध आहे.

श्री कृष्णा असोसिएट्स, पुणे ५११०३३

'ग्रेट निकोबार'मुळे चीनवर दबाव

एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'आपल्या देशात खोल समुद्रातील बंदरे नाहीत. आता देशाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अनेक महत्त्वाची पावले टाकण्यात येत आहेत. अंदमान-निकोबार बेटांजवळच्या खोल समुद्रात बंदर उभारण्यात येत आहे. केंद्र सरकारच्या ग्रेट निकोबार प्रकल्पामुळे चीनवर दबाव निर्माण होईल,' असे मत एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले यांनी शनिवारी व्यक्त केले.

लेफ्टनंट जनरल (निवृत्त) सुदर्शन हसबनीसलिखित 'ऑपरेशन सिंदूर' या पुस्तकाच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन गोखले यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. लेखक हसबनीस, अनुवादक 'लोकसत्ता'चे वरिष्ठ उपसंपादक डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रकाशक अखिल मेहता, पहलगाम हल्ल्यात जीव गमावलेल्या संतोष जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे आदी या वेळी उपस्थित होते.

गोखले म्हणाले, 'इराण आणि आखातातून येणाऱ्या तेलासाठी युद्ध संपण्याची आपण सगळेच वाट पाहत आहोत. कोणत्याही युद्धात, लढाईत किती वातावरण होते, त्याचे नेमके परिणाम काय होतात, हे ते युद्ध, ती लढाई कधी संपते, यावर अवलंबून असते. दुसरे महायुद्ध संपायला पाच वर्षे लागली. मात्र, 'ऑपरेशन सिंदूर' केवळ७२ तासांत संपले. युद्ध कधी संपवायचे याचे हे अत्यंत महत्त्वाचे उदाहरण आहे.'

'दहशतवाद्यांनी २२ एप्रिलला २६ कुटुंबांचा संसार उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. पण, त्या कुटुंबांनी दाखविलेल्या धैर्याने आणि भारताने दिलेल्या उत्तराने जगाला दाखवून दिले, की दुःख आम्हाला खचवत नाही. ते आम्हाला अधिक दृढ, अधिक एकसंध, अधिक सक्षम बनवते,' अशी भावना लेफ्टनंट जनरल हसबनीस सांगी व्यक्त केली. कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले.

हेमचंद्र कोपर्डेकर यांचे निधन



पुणे : भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी डॉ. हेमचंद्र दत्तात्रय कोपर्डेकर (वय ८८) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

पुणे महापालिकेची पदवी घेतल्यानंतर कोपर्डेकर १९६० मध्ये नगरस्थान विभागात रूजू झाले. पुणे, मुंबई, पंढरपूर, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या विभागांत त्यांनी महत्त्वाचे पदांवर काम केले. नवी मुंबईची संकल्पना मांडून त्यासाठीच्या समितीचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. तत्कालीन 'बीएमआरडीए' व विद्यमान 'एमएमआरडीए'च्या स्थापनेतही त्यांचा मोठा वाटा होता.

'नागरी विकासाचे सामाजिक पैलू' या विषयावर त्यांनी मुंबई विद्यापीठातून पीएच. डी. पूर्ण केली. १९८३ मध्ये त्यांची राज्य शासनाने भारतीय प्रशासकीय सेवेत निवड केली. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, १९८४ ते १९९१ या कालावधीत अखिल भारतीय स्वतंत्र सेवेचे महासंचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. तेथे त्यांनी महाराष्ट्रातील नगरपालिकांमध्ये मुख्याधिकारी पदासाठी निवड झालेल्या मुख्याधिकाऱ्यांसाठी विशेष अभ्यासक्रम तयार केला.

१९९१ ते १९९४ दरम्यान नेपाळमध्ये जर्मन तांत्रिक सहकार्य संस्था - 'जीआयझेड'मध्ये विशेष सल्लागार म्हणून त्यांनी काम केले.

IDBI BANK CIN:L65190MH2004GOI148838

आयडीबीआय. बँक लि., रिटेल रिकव्हरी,
आयडीबीआय हाऊस, पहिला मजला, जानेश्वर पाटुळा चौक, एफ.सी. रोड, शिवाजीनगर, पुणे - 411004.

विक्री सूचना

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक सूचना
परिशिष्ट IV-A (नियम 8(6)(1)ची तरतुद)*

सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमांच्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचलेल्या आयडिए मालमत्तेचे लिक्विडेशन अँड रिकव्हरबलर अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट रिलर, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींसह वाचलेल्या आयडिए मालमत्तेचे लिक्विडेशन अँड रिकव्हरबलर अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जी सुरक्षित धनको म्हणजे आयडीबीआय बँक लि., सुरक्षित खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार कर्जदार, हमीदार आणि त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींकडून थकीत कर्जाच्या वसुलीसाठी आयडीबीआय बँक लि., लिक्विडेटर, सिक्युरिटी इंटरेस्ट "जिथे आहे तिथे", "जशी आहे तशी", आणि "जिथे जे असे ते तेथे" तत्त्वेच्या अंतर्गत खाली नमूद केल्याप्रमाणे असलेल्या